





दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



विकास वॉटरप्रुफिंग

घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष

विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरेंटीने लिकेच थांबवली जाते.

संपर्क : M- 9067317011 / 7387644827



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २१२ वा | शनिवार, दि. २८ मार्च २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR




## संपादकीय

# भूमिपुत्रांचा इतिहासकार

ज्येष्ठ इतिहासकार आणि लेखक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या निधनामुळे मातीत रुजलेला आणि भूमिपुत्रांच्या इतिहासावर प्रकाश टाकून महाराष्ट्राच्या इतिहास अभ्यासाला नवी दृष्टी देणारा इतिहासकार हरपला. छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज, महाराणी ताराराणी यांच्यापासून राजर्षी शाहू महाराज आणि क्रांतिसिंह नाना पाटील अशा अनेक लोकोत्तर व्यक्तिमत्त्वांचे नवे पैलू त्यांनी समाजापुढे आणलेच; त्याशिवाय त्यांची वर्तमानाशी नाळ जोडून समाजाला वैचारिकदृष्ट्या पुढे नेणारी दिशा दाखवणारे विचारवंत म्हणूनही ते महाराष्ट्राला ज्ञात आहेत. सांगली जिल्ह्यातील तडसर गावी एका शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. पुढे कोल्हापूरच्या राजाराम महाविद्यालयात शिक्षण घेत असताना त्यांना इतिहासाची गोडी लागली. डॉ. अप्पासाहेब पवार यांच्यासारख्या गुरूने त्यांना ऐतिहासिक दस्तावेज-हस्तलिखिते वाचन-विश्लेषणाचे दालन उघडून दिले. पदव्युत्तर शिक्षण आणि डॉक्टरेट मिळवताना त्यांनी संशोधनपर लेखनही सुरू केले. तीन दशके त्यांनी अध्यापन केले. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी अनेक क्रमिक पुस्तकांचेही लेखन त्यांनी केले. तोवरच्या इतिहासकारांकडून काहीशा दुर्लक्षित राहिलेल्या भूमिपुत्रांच्या, बहुजनांच्या आणि स्त्रियांच्या इतिहासावर टाकलेला नवा प्रकाश, हे त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान.

त्यांनी अनेक इतिहास परिषदांचे अध्यक्षपद भूषविले आणि विविध पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले आहे. महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनीची त्यांनी स्थापना केली.

राजर्षी शाहू महाराजांच्या कारकिर्दीचा वेध घेणारा बाराशे पानी-तीन खंडांचा राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ हे त्यांच्या अभ्यासपूर्ण लेखनातील मोलाचे योगदान. पुराव्यांची सूक्ष्म तपासणी, तटस्थपणा, अभ्यासाचा पक्का पाया आणि चौफेर वाचनाने विकसित झालेली दृष्टी ही त्यांच्या चिंतनाची वैशिष्ट्ये ठरली. त्याच बळावर इतिहासाच्या अभ्यासकांसह सर्वसामान्यांमध्येही त्यांच्या शब्दांना वजन प्राप्त झाले. 'कितीही कटू असले, तरी सत्य स्वीकारावे' आणि 'इतिहास कोणत्याही वादासाठी नसावा,' ही दृष्टी देणारे डॉ. जयसिंगराव पवार यांना श्रद्धांजली.

# 'भक्ती की भ्रम?'

अशोक खरात या भोंदू बाबाच्या कृष्णकृत्यांच्या एकेक कहाण्या बाहेर येत आहेत. त्या इतक्या लाजिरवाण्या आणि विकृत आहेत की ऐकायलाही आणि पाहायलाही मन धजावत नाही. लोकांच्या श्रद्धेचा गैरफायदा घेऊन एखादा माणूस इतका नीचपणा कसा करू शकतो, असा प्रश्न सामान्य जणांना नक्कीच पडतो.

लोक स्वतःच्या प्रापंचिक, व्यावसायिक अडचणींमधून किंवा पापमुक्तीसाठी अशा बाबांच्या वळचणीला लागतात. वर्षानुवर्षे विविध संकटांमधून मार्ग सापडत नाही; अशा वेळी कोणी तरी या अशा भोंदू बाबांचा सल्ला देतो. मग मुंग्यांसारखे एक-एक करून वेगवेगळ्या अपेक्षांनी भक्तगण वाढत जातात. एखाद्याची महत्त्वाकांक्षा इतकी वाढलेली असते की अपेक्षित यश मिळवण्यासाठी ते कोणत्याही थराला जाऊ शकतात. अशा लोकांना जर अघोरी विद्या करणाऱ्या भोंदू बाबांचा पत्ता लागला, तर ते त्यांचे निष्ठावान भक्त बनतात. भोंदू बाबा आपल्या शब्दजाळ्यात अनेक पीडित, अति महत्त्वाकांक्षी आणि अडचणीत सापडलेल्या लोकांना अडकवतात. कोळ्याच्या जाळ्यात अडकलेल्या किड्याप्रमाणे, हे लोक त्यांच्या जाळ्यात अडकतात. त्यांचे आर्थिक, शारीरिक आणि मानसिक शोषण केले जाते. पीडित व्यक्तींना तोंड उघडताही येत नाही; ते मानसिक गुलाम बनतात.

खरं तर हे तथाकथित बुवा, बाबा, स्वामी, महाराज, मांत्रिक, देवऋषी, संत-महंत स्वतःच्या तथाकथित दैवी शक्तींचा दिखावा करून लोकांची दिशाभूल करण्याचा धंदा करत असतात. या भोंदू बाबांच्या अन्यायाला सर्वात आधी महिला बळी पडतात. आपल्या समाजात महिलांच्या मानसिक आधारासाठी सक्षम यंत्रणा नसल्याने, त्या अशा बाबांच्या सत्संग, प्रवचन आणि सहवासाचा आधार घेतात. यातून काही वेळा त्यांचे लैंगिक शोषणही होते.

'आपण कोणत्या तरी समूहाचा भाग आहोत' ही भावना माणसाला समाधान देते. मोठ्या भक्तगणामध्ये आपण आहोत, याचा आनंद घेत लोक त्यात गुंतत जातात आणि बाबांचा प्रभाव वाढत जातो. खरे-खोटे, इष्ट-अनिष्ट याचा डोळसपणे विचार करण्याची सवय समाजात कमी असल्यामुळे बुवाबाजीला खतपाणी मिळते.राजकीय व्यक्ती आणि भोंदू बाबा यांच्यातील संबंध समाजाची दशा आणि दिशा बिघडवत आहेत. शिष्य बनून सामाजिक प्रतिष्ठा मिळवणारे राजकारणी आणि त्यांना पाठिंबा देणारे बाबा—दोघांचाही फायदा होतो. पैसा, सत्ता, प्रसारमाध्यमे, गुंडगिरी आणि दहशत या सर्व गोष्टी भोंदू बाबांच्या हातात असतात. त्यामुळे त्यांच्या विरोधात आवाज उठवणाऱ्यांची गळचेपी होते.

बुवाबाजी रुजण्यामागे दोन महत्त्वाचे आधार आहेत— कर्मसिद्धांत आणि चमत्कार. 'चांगल्या कर्माचे चांगले फळ आणि वाईट कमार्चे वाईट परिणाम' हा सिद्धांत मान्य असला तरी, नेमके चांगले आणि वाईट काय याबाबत स्पष्टता नसते. चमत्कार करणाऱ्या व्यक्तीबद्दल लोकांमध्ये आदर, पूज्यभाव आणि श्रेष्ठत्वाची भावना निर्माण होते. विज्ञान शिकलेले लोकही या चमत्कारांपुढे नतमस्तक होतात. प्रार्थना, प्रवचने, गुरुभक्ती आणि पारायण यामधून शिष्यांना संसारातील चिंता विसरण्याचा मार्ग मिळतो. गुरुपरंपरा ही आपल्या संस्कृतीचा महत्त्वाचा भाग असली, तरी भोंदू बाबा तिचा गैरवापर करून स्वतःची प्रतिष्ठा वाढवतात.

आपल्या देशातील संतांनी धर्माच्या माध्यमातून मानवतेचा मार्ग दाखवला, कृतिशील आचरणाची शिकवण दिली. पण भोंदू बाबा व्यक्तीपूजेला खतपाणी घालून लोकांना अंधानुकरणाकडे नेतात आणि सत्ताधीशासह एकूण सर्व समाजावर आपला प्रभाव निर्माण करतात. बुवाबाजीला शरण जाणे ही घातक अंधश्रद्धा आहे. यामुळे निर्माण होणारी पैसा, सत्ता आणि दहशतीची साखळी समाजासाठी धोकादायक आहे. राजकारण्यांनी अशा बाबांना शरण जाणे हे लोकशाहीसाठीही घातक आहे.

अशा काळात भारतीय संविधानाने दिलेल्या वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या कर्तव्याची जाणीव समाजाला करून देणे अत्यंत आवश्यक आहे. प्रत्येक नागरिकाने शोधक बुद्धी, सुधारणावाद आणि मानवतावाद यांचा स्वीकार केला पाहिजे. बुवाबाजीला शरण जाणे म्हणजे आपल्या घटनात्मक कर्तव्याला तिलांजली देणे होय.

'ऐसे कैसे झाले भोंदू,
कर्म करूनी म्हणती साधू।
अंगा लावुनिया राख,
डोळे झाकुनी करतो पाप।
दावी वैराग्याची कळा,
भोगी विषयांचा सोहळा।
तुका म्हणे सांगो किती,
जळो तयांची संगती॥'

संत तुकाराम महाराजांनी दिलाला हा इशारा आजही तितकाच लागू आहे. महात्मा फुले यांनीही 'शेतकऱ्याचा असूड'मधून अशाच भोंदूगिरीवर कठोर प्रहार केला होता.

आज गरज आहे ती अंधश्रद्धेच्या अंधारातून बाहेर पडण्याची, विवेकाच्या प्रकाशात उभे राहण्याची आणि आपली भक्ती ही भक्ती आहे की भ्रम आहे हे पाहण्याची.



- **किशोर जाधव,** सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१

# जि.प. अध्यक्ष-उपाध्यक्षांचे निर्देश; सोमवार-गुरुवारी हजर राहा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :-** जिल्हा परिषदेच्या कामानिमित्त ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी सोमवार व गुरुवार या दिवशी सर्व विभागप्रमुखांनी कोणत्याही परिस्थितीत मुख्यालयात उपस्थित राहावे, असे निर्देश जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य व उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांनी दिले.

बुधवारी विविध विभागांचा आढावा घेतल्यानंतर गुरुवारी ग्रामपंचायत, आरोग्य, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण तसेच योजना विभागाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी त्यांनी प्रशासनाला आवश्यक त्या सूचना दिल्या. बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम उपस्थित होते.

यापूर्वी जिल्हा परिषदेकडे असलेल्या कृषी व पशुसंवर्धन विभागाच्या काही योजना राज्य शासनाकडे वर्ग करण्यात आल्या आहेत. त्या योजना पुन्हा जिल्हा परिषदेकडेच राहाव्यात, यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम यांनी शासन स्तरावर प्रयत्न करावेत, अशी सूचना करण्यात आली. या मागणीसाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या माध्यमातून पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे उपाध्यक्ष पवार यांनी स्पष्ट केले.

आरोग्य केंद्रे व अंगणवाड्या वीज बिलमुक्त करण्याचा प्रस्ताव

जिल्हा परिषदेच्या शाळा, आरोग्य केंद्रे व अंगणवाड्यांना येणाऱ्या वीज बिलाच्या समस्येवर उपाय म्हणून सौर पॅनल बसविण्याचा प्रस्ताव पुढे आला आहे. याबाबत नियोजन करून चार टप्प्यांत काम पूर्ण करण्यात येईल, अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली.

**शाळांची स्वच्छता ग्रामपंचायतींकडून करण्याच्या सूचना**

जिल्हा परिषद शाळांमध्ये शिपाई नसल्यामुळे स्वच्छतेची जबाबदारी शिक्षक व विद्यार्थ्यांवर येते. या पार्श्वभूमीवर शासन निर्णयानुसार संबंधित ग्रामपंचायतींनी आठवड्यातून किमान दोन दिवस उपलब्ध कर्मचाऱ्यांकडून शाळांची स्वच्छता करावी, अशा सूचना उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांनी दिल्या.

# अकलूज येथील धवल श्रीराम मंदिरात रामनवमी उत्साहात साजरी

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज येथील धवल श्रीराम मंदिरात भक्तीभावाने रामनवमी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी विविध धार्मिकी कार्यक्रमही साजरे केले.

रामनवमी निमित्ताने धनश्री नगरातील धवल श्रीराम मंदिरात श्रीराम सार्वजनिक ट्रस्टच्यावतीने श्रीराम-सितामाई व लक्ष्मणाच्या मुर्तीची महापुजा व विष्णु याग प्रज्वलन ट्रस्ट अध्यक्ष डॉ.धवलसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते करण्यात येवुन विराज लोंढे व प्रिया लोंढे उभयतांच्या हस्ते आरती करण्यात आली. दुपारी शंकरनगरच्या माऊली व श्रीराम भजनी मंडळा च्या भावपूर्ण भजनात श्री रामभक्तांनी पुष्पवृष्टी केली. ट्रस्टचे उपाध्यक्ष आण्णासाहेब शिंदे व सारीका शिंदे उभयतांच्या हस्ते आरती होऊन उपस्थित महिलांनी पाळण्याचे पुजन करीत पाळणा म्हणाला.



याप्रसंगी सहसचिव पिंटू वैद्य, खजिनदार शेखर शेंडगे, सदस्य नितीन शिंदे, जनसेवेचे बबनराव शेंडगे, ज्योती कुंभार यांच्यासह कार्यकर्ते,महिला व पुरुष रामभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांना ट्रस्टच्यावतीने महाप्रसादाचा लाभ देण्यात आला.

**संग्रामनगर येथील श्री साईबाबा सेवा ट्रस्टच्यावतीने श्री साई मंदिरात**

२९ वा प्राण प्रतिष्ठा वर्धापन व राम नवमी निमित्ताने श्री साईची महापुजा डॉ.रावसाहेब गुळवे यांच्या हस्ते सपत्नीक करण्यात आली.यज्ञ प्रज्वलन विनय उंट यांच्या हस्ते करण्यात आले.दुपारी शिवशंभो भजनी मंडळाने सुसाव्य असे भजन झाले. रामभक्तांनी पुष्पवृष्टी करत उपस्थित महिलां भगिनींनी पाळणा म्हणाला.यावेळी सदस्य राजेंद्र आर्वे व भारती आर्वे उभयंताच्या हस्ते आरती करण्यात येवुन भक्तांना महाप्रसाद देण्यात आला.याप्रसंगी अध्यक्ष किशोरसिंह माने पाटील, उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते पाटील श्रीराज माने पाटील, ट्रस्टी हनुमंतराव खडके, चंद्रकांत कुंभार, आदेश शहा, अजित राखले, बाळासाहेब सणस, देविचंद ओसवाल, उमेश शेटे, विजय टोंगळे,दिपक शिंदे अजित माने, जयंत कुलकर्णी, सुभाष काळे, चंदु काळे, धन्नम बोहरी, महेश सूर्यवंशी यांच्यासह रामभक्त बहु संख्येने उपस्थित होते. उपस्थितांना महाप्रसाद देण्यात आला. शंकरनगर येथील मारुती मंदिरात मदनसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते पुजा व आरती करण्यात आली. अकलूज शहरातील हनुमान मंदिरात पजा-आरती करण्यात येवून पाळणा पुजन व पाळणा म्हणण्यात आला तसेच सदुभाऊ चौकात हिंदू राष्ट्र प्रतिष्ठानच्या वतीने श्रीरामाची मुर्ती पुजा करण्यात येवुन भक्तांना महाप्रसादाचा लाभ देण्यात आला.

## सोलापूर झेडपीचे सभापती जाहीर

# सातपुते, चिवडशेट्टी, वाघे, केदार-सावंत यांना लॉटरी




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा परिषदेच्या बहुचर्चित विषय समित्यांच्या सभापतींची नावे भारतीय जनता पक्षाने आज (ता. 27 मार्च) जाहीर केली. त्यामध्ये जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांच्याकडे अर्थ व बांधकाम, माजी आमदार राम सातपुते यांच्या पत्नी संस्कृती सातपुते यांच्याकडे समाज कल्याण, दक्षिण सोलापूरचे रामप्पा चिवडशेट्टी यांना कृषी व पशुसंवर्धन, तर माढ्यातील अमृता वाघे यांना महिला व बाल कल्याण सभातिपदी संधी दिली आहे.

जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांच्याकडे शिक्षण व आरोग्य समितीचे सभापतिपद सोपविण्यात आले.

आमदार, माजी आमदार आणि वरिष्ठांशी चर्चा करून पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सभापतींच्या नावांची घोषणा केली आहे. ही निवड अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांच्याप्रमाणे सव्वा वषासाठी असणार की अडीच वषार्साठी याची उत्सुकता आहे. या सर्वांची बिनविरोध निवड झाली आहे.

सोलापूर जिल्हा परिषदेच्या इतिहासात भारतीय जनता पक्षाने प्रथमच ६८ पैकी ३८ जागा जिंकून ऐतिहासिक यश मिळविले होते. भाजपचा पहिला जिल्हा परिषद अध्यक्ष म्हणून बार्शीच्या दीपक वैद्य यांना संधी देण्यात आली आहे, तर उपाध्यक्षपद हे उत्तर सोलापूर तालुक्यातील इंद्रजीत पवार यांच्याकडे सोपविण्यात आलेले आहे. त्यामुळे आता सभापतिपदाची उत्सुकता होती.

जिल्हा परिषदेचे अर्थ व बांधकाम समितीचे सभापतिपद हे पारंपारिक पद्धतीनुसार उपाध्यक्षांकडे जाते, त्यामुळे इंद्रजीत पवार यांच्याकडे अर्थ व बांधकाम समितीचे सभापतिपद गेले आहे.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील वळसंग जिल्हा परिषद गटातून निवडून आलेले रामप्पा चिवडशेट्टी यांना कृषी व पशुसंवर्धन समितीच्या सभापतिपदाची संधी देण्यात आली आहे. ते अध्यक्षपदासाठी इच्छूक होते. मात्र, आता सभापतिपद मिळाल्याने त्यांची अध्यक्षपदाची दावेदारी संपल्यात जमा आहे.

माळशिरसचे माजी आमदार राम सातपुते यांच्या पत्नी संस्कृती सातपुते यांच्याकडे समाज कल्याण समितीची धुरा देण्यात आली आहे. त्या माळशिरसमधील दहिगाव गटातून निवडून आलेल्या आहेत.

तसेच, पत्नीला सभापती करून राम सातपुते यांनी सतेच्या माध्यमातून तालुक्यातील लोकांशी कनेक्ट राहील, याची काळजी घेतल्याचे दिसून येते. मोहिते पाटील यांना विधानसभेच्या निवडणुकीपासून टोकाचा विरोध करणाऱ्या सातपुते यांच्या पाठीशी सभापतिपदाच्या माध्यमातून सत्तेचे पाठबळ देण्याचा प्रयत्न पालकमंत्री गोरे यांनी केला आहे.

माढा तालुक्यातील टेंभुर्णी गटातून विजयी झालेल्या ॲड अमृता नागनाथ वाघे यांच्याकडे महिला व बालकल्याण समितीचे सभापतिपद देण्यात आलेले आहे, त्यामुळे विधानसभेपासून बॅकफूटवर गेलेल्या माजी आमदार बबनराव शिंदे गटाला सत्तेची ऊर्जा मिळाली आहे.

भारतीय जनता पक्षाच्या पश्चिम विभागाचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनाही सभापतिपदाची संधी देण्यात आली आहे. त्यांच्याकडे शिक्षण व आरोग्य समितीचे सभापतिपद सोपविण्यात आलेले आहे. एकंदरीतच सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद हे धाराशिव लोकसभा मतदारसंघात, उपाध्यक्षपद हे सोलापूर, तर तीन महत्वाची सभापतिपदे ही माढा लोकसभा मतदारसंघात गेली आहेत.

# पंढरपूर-फलटण व जेऊर आष्टी या मंजूर रेल्वे मार्गासाठी तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा - खा. मोहिते पाटील

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी लोकसभे मध्ये माढा लोकसभा मतदारसंघातील प्रलंबित रेल्वे प्रश्नांबाबत विविध महत्त्वपूर्ण मागण्या मांडत केंद्र सरकारचे लक्ष वेधले. मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी रेल्वे सुविधा वाढविणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पंढरपूर-फलटण व जेऊर आष्टी या मंजूर रेल्वे मागार्साठी तातडीने निधी उपलब्ध करून देऊन काम लवकर सुरू करावे, अशी मागणी केली.



सांगोला येथून पूर्वी सुरू असलेली किसान रेल्वे पुन्हा सुरू करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली. यासंदर्भात विभागीय रेल्वे व्यवस्थापक (DRM) यांच्यामार्फत रेल्वे बोर्डाकडे प्रस्ताव पाठविण्यात आल्याची माहिती देत ही सेवा लवकर सुरू करावी, असे त्यांनी नमूद केले. यामुळे शेतकऱ्यांना भाजीपाला व कृषीमाल देशभर पाठविणे सोपे होईल.

मतदारसंघातील ग्रामीण भागातील नागरिकांच्या सोयीसाठी

सांगोला तालुक्यातील : बामणी, जवळा पंढरपूर तालुक्यातील बाभुळगाव, माढा तालुक्यातील लऊळ व म्हैसगाव येथे नवीन रेल्वे स्थानक उभारण्याचे मागणी केली.

माढा जेऊर रेल्वे स्थानकावर हुतात्मा एक्सप्रेस, उद्यान एक्सप्रेसचे थांबे द्यावे जेऊर स्थानकावर सोलापूर-अजमेर-सोलापूर विशेष गाडीला थांबा द्यावा.त्याच बरोबर कुडूर्वाडी रेल्वे जंक्शनवर चेन्नई-LTT, विशाखापट्टणम आणि राजकोट एक्सप्रेसला थांबे द्यावे अशी मागणी केली.

माढा मतदारसंघातील प्रलंबित रेल्वे प्रश्नांना गती द्यावी रेल्वे सुविधा वाढवावी त्यामुळे माढा मतदारसंघाच्या आर्थिक व सामाजिक विकासाला मोठी चालना मिळेल, असा विश्वास खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी व्यक्त केला.

# आरोग्याची वारी शिवशंभोच्या दारी, २ हजार शिव भक्तांना घेतला आरोग्य सेवेचा लाभ

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** शिखर शिंगणापूर यात्रेनिमित्त अनेक भाविक कावड खांद्यावर घेऊन चैत्र वारीसाठी शिखर शिंगणापूर येथील श्री शंभू महादेवाच्या दर्शनासाठी मराठवाडा, विदर्भ, कर्नाटक आदी भागातून पायी चालत येत असतात. यामध्ये मोठ्या संख्येने महिला वर्ग, जेष्ठ नागरिक व युवक मोठ्या उत्साहाने कावड यात्रेमध्ये सहभागी होतात. हे सर्व शिवभक्त अनवाणी पायी चालत येत असल्याने अनेकांच्या पायाला भेगा पडून रक्तस्राव होत असतो तर अनेकांना वैद्यकीय समस्यांना शिवभक्तांना सामोरे जावे लागते या सर्व बाबींची दखल घेऊन शिवसेना ओबीसी चे जिल्हाप्रमुख राजकुमार हिवरकर पाटील यांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा मुख्य नेते एकनाथराव शिंदे यांच्या संकल्पनेतून व आरोग्य मंत्री प्रकाश आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली यात्रेसाठी येणाऱ्या शिवभक्तांसाठी माळशिरस तालुक्यामध्ये विविध ठिकाणी हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्याची निर्मिती




करण्यात आली असून त्यापैकी नातेपुते येथील गिरजापती मंदिरा लगत निर्मिती करण्यात आलेल्या दवाखान्यामध्ये २ हजार पेक्षा जास्त शिवभक्तांनी आरोग्य सेवेचा लाभ घेतला. यामध्ये शिवभक्तांचे ब्लड प्रेशर तपासणी, आरोग्याच्या समस्या जाणून घेऊन त्यावर उपचार करणे, योग्य औषधोपचार देणे, शरीरातील थकवा दूर करण्यासाठी इलेक्ट्रॉन पावडर देणे इत्यादी उपचार करून शिवभक्तांच्या तपासण्या करून आवश्यकतेनुसार औषधे उपचार त्या ठिकाणी शिवभक्तांना मोफत देण्यात आले असून अनेक शिवभक्त या दवाखान्याचा लाभ घेत आहेत.

डॉ. शिवाजी शेंडगे. वैद्यकीय अधिकारी, साधना दोलताडे. औषधं निर्माण अधिकारी, चिऊताई पाखरे. परिचारिका प्राथमिक आरोग्य केंद्र मांडवे श्री शंभू महादेव यात्रा अंतर्गत नातेपुते येथील औषधोपचार केंद्र. श्रीमंती डॉ सावंत एस बी वैद्यकीय अधिकारी श्री धाईजे ए बी. आरोग्य सहाय्यक, गुजरे एस आर. आरोग्य सहाय्यक . डॉ खोकले, निलोफर मुलाणी, मंगल सूळ , मंगल काळे आरोग्य सेविका. व आरोग्य सेवक जाधव एस. एस. नलावडे एस. पी., तोडकर एस. एन. हे त्या ठिकाणी काम पाहत आहे.

# मंगळवार बाजारात अतिक्रमण कारवाई; सात खोकी जमीनदोस्त



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरातील अतिक्रमणांविरोधात महापालिकेच्या अतिक्रमण प्रतिबंधक विभागाने सुरू केलेल्या मोहिमेअंतर्गत मंगळवार बाजारातील मच्छी मार्केट परिसरात गुरुवारी मोठी कारवाई करण्यात आली. या कारवाईत सात खोकी जेसीबीच्या सहाय्याने जमीनदोस्त करण्यात आली. मात्र, संबंधित अधिकाऱ्यांच्या गैरहजेरीमुळे कारवाईदरम्यान मोठा गोंधळ उडाला आणि परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले.

मंडई विभागाने दिलेल्या पत्रानुसार या परिसरातील अतिक्रमणांवर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार अतिक्रमण विभागाचे नियंत्रण अधिकारी तपन डंके यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई सुरू करण्यात आली. मात्र, कोणते खोके अधिकृत आणि कोणते अनधिकृत याची स्पष्ट माहिती देण्यासाठी संबंधित अधिकारी उपस्थित नसल्याने कारवाईदरम्यान गोंधळ निर्माण झाला.

कारवाई सुरू होताच अनेक खोकेधारकांनी जुने दंड भरल्याच्या पावत्या दाखवत आपले खोके अधिकृत असल्याचा दावा केला आणि कारवाई थांबवण्याची मागणी केली. मात्र, अतिक्रमण विभागाने कठोर भूमिका घेत 'दंड भरल्याने कारवाई टाळता येणार नाही' असे स्पष्ट करत कारवाई सुरूच ठेवली.

या वेळी परिसरात मोठ्या प्रमाणात नागरिकांची गर्दी झाली होती. उन्हाच्या कडाक्यात पोलिस बंदोबस्तात ही कारवाई पार पडली. काही खोक्यांमध्ये बेकायदेशीर वीज जोडणी आढळून आल्याने महावितरणला कळवून संबंधितांवर कारवाईचा इशारा देण्यात आला. तसेच काही खोक्यांमध्ये ठेवलेल्या शेळ्यांना बाहेर काढताना कर्मचाऱ्यांना मोठी कसरत करावी लागली. या संपूर्ण घटनेत प्रशासनातील समन्वयाचा अभाव प्रकर्षाने दिसून आला असून स्थानिक अधिकाऱ्यांच्या गैरहजेरीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

**अतिक्रमण विभाग-मंडई विभागात समन्वयाचा अभाव**

यापूर्वी अक्कलकोट रस्त्यावरील कारवाईदरम्यान तणाव निर्माण झाल्याने झोन कार्यालयाकडून संबंधितांना ३१ मार्चपर्यंत अतिक्रमण काढण्याची मुदत देण्यात आली होती. यावरून अतिक्रमण विभाग व झोन अधिकाऱ्यांमध्ये वाद झाला होता. आता मंगळवार बाजारातील कारवाईवेळी मंडई विभागाचे अधिकारी गैरहजर राहिल्याने अतिक्रमण विभाग व मंडई विभागातही वाद निर्माण झाला असून प्रशासनातील समन्वयाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## वात्रटिका

### सोसा झळा आता

भोंदू होता बाबा तरी
तो कोणाला तरी पावला...
उघड झाले झाकलेले
आणि कोणाला तरी भोवला...
कोणाचा पराक्रम उगाच
कोणावर शेकू नये...
अधिकारी बडतर्फ, मग
नेत्याचा गुन्हाही झाकू नये....

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# अंनिसचे इशाराः भोंदू बुवा-बाबांवर त्वरित कारवाई करा



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यासह राज्यात जादूटोणाविरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी, तसेच भोंदूगिरीच्या प्रकरणांवर तात्काळ कठोर कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (अंनिस) मोहोळ शाखेच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबतचे निवेदन तहसीलदारांमार्फत जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात आले.

या वेळी अंनिसचे सुधाकर काशीद, धर्मराज चवरे, बिरबल खांडेकर, श्रीधर उन्हाळे, ॲड. विनोद कांबळे, मोहन व्यवहारे, मनोहर गोडसे, रमेश दास, हनुमंत यादव, नागेश मते आणि संजय भोसले उपस्थित होते.

निवेदनात अंनिसने म्हटले आहे की, राज्यात अलीकडे उघडकीस येणाऱ्या भोंदू बुवा-बाबांच्या घटनांमुळे समाजात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. दैवी शक्ती, चमत्कार, ज्योतिष किंवा अध्यात्माच्या नावाखाली अनेक ठिकाणी नागरिकांची आर्थिक फसवणूक, मानसिक छळ तसेच महिलांचे लैंगिक शोषण होत असल्याच्या घटना समोर येत आहेत. अशा प्रकारांमुळे समाजात अंधश्रद्धेला खतपाणी मिळत असून गुन्हेगारी प्रवृत्तीला चालना मिळण्याचा धोका निर्माण होत आहे.

त्यामुळे फलज्योतिष, दैवी शक्ती किंवा चमत्कारांच्या नावाखाली लोकांची फसवणूक करणाऱ्यांविरोधात जिल्हा पोलिस प्रशासनाने तातडीने तपास करून गुन्हे दाखल करावेत व दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

तसेच समाजात वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार करण्यासाठी शाळा व महाविद्यालयांमध्ये जनजागृती मोहीम राबवावी, असेही अंनिसच्या वतीने नमूद करण्यात आले आहे.

## सांगोले नगरपरिषद,सांगोले,जि.सोलापूर

दूरध्वनी क्र.(०२१८७)२२११७४/२२००१८.
टोल फ्री क्रमांक- १८००२३३२१९०. Email- comcsangola@gmail.com,

जा.क्र.सांनपा/पापु/कावि-९/आरआर/१५२९/२६ दि. २७/०३/२०२६

### जाहीर निविदा प्रसिध्दीकरण

सांगोले नगरपरिषदेकडील पाणीपुरवठा विभागासाठी खाली नमुद केलेले विविध कामांसाठी अनुभवी व नोंदणीकृत मक्तेदार यांचेकडून सिलबंद निविदा मागविणेत येत आहेत.

| अ. नं. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाणा रक्कम | फॉर्म किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | शहरातील सनगर गल्ली येथील खा-या विहिरीचा गाळ काढणे. | १,७०,४७१/- | २,०००/- | ५०० |
| २ | शहरातील आठवडा बाजार आवारातील विहिर, कुंभार गल्ली येथील च विहिरीचा गाळ काढणे. | १,९४,७८३/- | २,०००/- | ५०० |
| ३ | चिंचोली रोड लोहारवस्ती येथे इनामदार गुरुजी घर ते युवराज केदार घर ते शशिकांत चौधरी घरापर्यंत पाण्याची पाईपलाईन टाकणे. | १,४५,९७५/- | १,५००/- | ५०० |
| ४ | चिंचोली रोड नादर मुलाणी वस्ती येथे पाण्याची पाईपलाईन टाकणे. | ६३,८६८/- | १,०००/- | ५०० |
| ५ | राऊत मळा येथे बजरंग सदाशिव राऊत घर ते समाधान इंगोले घरापर्यंत पाण्याची पाईपलाईन टाकणे. | १,३१,९०१/- | १,५००/- | ५०० |
| ६ | राऊत मळा शांताराम शिवाजी फुले घर ते सटवाई मंदिर कॅनालपर्यंत पाण्याची पाईपलाईन टाकणे. | १,४७,३२०/- | १,५००/- | ५०० |
| ७ | गणेश मारुती फुले घर ते नवनाथ गणपत लोखंडे घरापर्यंत पाण्याची पाईपलाईन टाकणे. | १,५९,२५४/- | २,०००/- | ५०० |
| ८ | फुले नगर संभाजी नारायण राऊत घर ते लखन राजाराम गोडसे घरापर्यंत पाण्याच पाईपलाईन टाकणे. | १,४०,३१८/- | १,५००/- | ५०० |
| ९ | विद्यानगर येथे श्री निलेश पैलवान यांचे घरापासून शुभांगी सुभाष गाडे यांचे घरापर्यंत पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन टाकणे. | ४७, ५४२/- | ५००/- | ५०० |
| १० | फुलेनगर नवनाथ फुले घर येथे ओढ्यापर्यंत पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन टाकणे. | १,६१,६४२/- | २,०००/- | ५०० |

१) निविदा फॉर्म विक्री व स्विकृतीची दिनांक ३०/०३/२०२६ ते दिनांक १३/०४/२०२६ रोजी सायं.५.०० वाजेपर्यंत.
२) निविदा लिफाफा क्र.१ व २ उघडण्याचा दिनांक १५/०४/२०२६ रोजी सायं ५.०० वाजेपर्यंत.
निविदा फार्म विक्री व स्विकृती तसेच नियम, अटी व शर्तीची माहिती उपरोक्त कालावधीत नगरपरिषदेकडील पाणीपुरवठा विभागामध्ये शासकीय सुट्टी वगळता कार्यालयीन वेळेत पहावयास / विक्रीस मिळतील.

सही/-
मुख्याधिकारी
सांगोला नगरपरिषद सांगोला


**सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!**

श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे

वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.

1299/- प्रति स्क्वे. फूट

**मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर** मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.

9763764949


# अकलूज येथील जि. प. शाळेत तंबाखू मुक्त शाळा उपक्रम संपन्न




**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** तंबाखूमुक्त शाळा कार्यक्रम व मादक पदार्थांच्या दुष्परिणामाबाबत जागरूकता कार्यक्रम जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुली नंबर तीन व मुले नंबर दोन गणेशनगर अकलूज येथे उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमास लाभलेले प्रमुख वक्ते प्राध्यापक धनंजय देशमुख यांनी विद्यार्थ्यांना व्यसन व त्याचे दुष्परिणाम याचे खूप छान मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना आता सध्या विद्यार्थ्यांमध्ये चालू असलेले व्यसन म्हणजे कोको कोला, स्टिंग,थम्सअप याचे शरीरावर होत असलेले परिणाम त्यांनी विद्यार्थ्यांना विविध उदाहरणाद्वारे समजावून सांगितले. त्यामुळे विद्यार्थ्यांना ते समजण्यास सोपे झाले. तसेच ते सर्पमित्र असल्यामुळे विविध विषारी आणि बिनविषारी सापांची त्यांनी माहिती मुलांना सांगितली. व मुलांना शपथ दिली. रत्नाई कृषी महाविद्यालयाच्या भोसले मॅडम आणि त्यांची महाविद्यालयातील टीम यांनी यावर पथनाट्य सादरीकरण केले. दोन्ही शाळेतील विद्यार्थ्यांच्या वर्तनात बदल होणेइतका परिणामकारक असा कार्यक्रम झाला .

या कार्यक्रमाप्रसंगी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुले नंबर दोन च्या मुख्याध्यापिका सुकुमारी अंगुले, मनीषा बळवंतराव,अंजली अडाणे, दत्तात्रय गायकवाड, तय्यब शेख, फातिमा मुलाणी, श्रीकांत राऊत, हाजराबी बांगी, तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुली नंबर 3 चे मुख्याध्यापक दत्तात्रय कोरे, महादेव नागणे,रेखा कोळी, पांडुरंग मोहिते, सुरैय्या कोरबू, वर्षाराणी जाधव, समीर कोरबु व करीना शेख उपस्थित होते.


**आरोग्यविषयक**

**मुळव्याध आहे ?**

ऑपरेशन चा विचार करत असाल तर थांबा ऑपरेशन करून देखील कित्येक जणांचा त्रास पुर्वी पेक्षा भयंकर व उग्र रूप धारण करून पुन्हा उद्भवू शकतो म्हणून प्राचिन भारतीय आयुर्वेदिक अतिशय दुर्मिळ औषधींचा वापर करून बनवलेल्या मुळव्याध मुक्ती औषधांचा वापर करून रक्त पडणे, जखम होणे, कोंब (मोड) यांच्या वेदना, भयंकर आग (जळजळ), असह्य खाज, पचन क्रिया बिघडणे, बद्धकोष्ठता (शौचत्रास, मलावरोध, मलाचे खडे होणे) गॅसेस चा त्रास इ. सर्व समस्यांवर सुरक्षित, दुष्परिणाम रहीत, कायमस्वरूपी इलाजासाठी निः संकोच संपर्क साधावा.

संपर्क :
कुदरत हर्बल्स किल्लारी
ताः औसा जि. लातुर
मो.नंबर 9970115450


# सातही जागांवर विजय मिळवत जाधव पॅनलचे निर्विवाद वर्चस्व



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त) :-** येथील नामांकित श्री फत्तेसिंह शिक्षण संस्थेच्या विश्वस्त मंडळाच्या त्रैवार्षिक निवडणुकीत के. सजेर्राव जाधव विकास आघाडी पॅनलने सातही जागांवर विजय मिळवत सलग दुसऱ्यांदा आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले. विजयी उमेदवार पुढील तीन वर्षांसाठी संस्थेचा कारभार सांभाळणार आहेत.

या निवडणुकीत सात जागांसाठी एकूण १४ उमेदवार रिंगणात होते. संस्थेच्या ६३ सभासद मतदारांपैकी ५६ जणांनी मतदानाचा हक्क बजावला. गुरुवारी सायंकाळी सुमारे ५ वाजता मतमोजणी पार पडली असून तीन फेऱ्यांमध्ये निकाल निश्चित झाला. पहिल्या व दुसऱ्या फेरीत सत्ताधारी आणि विरोधी पॅनलमध्ये चुरशीची लढत झाली.

अखेर माजी आमदार टी. माने यांचे पुत्र तथा संस्थेचे माजी अध्यक्ष राजीव माने आणि विद्यमान संचालक बाळासाहेब मोरे यांच्या नेतृत्वाखालील जाधव विकास पॅनलने बाजी मारली. विजयी उमेदवारांमध्ये तानाजी चव्हाण (२९), महादेव माने (३३), राजीव माने (३४), बाळासाहेब मोरे (२८), प्रकाश पडवळकर (३५), मिलिंद साळुंखे (३३) आणि विकास सुखसे (३१) यांचा समावेश आहे.

विरोधी श्री राजे फत्तेसिंह प्रगती पॅनलचे उमेदवार सुभाष गडसिंग (२०), विलास गव्हाणे (२४), सुधाकर गोंडाळ (२५), बाबासाहेब निंबाळकर (२५), दत्तात्रय पाटील (२७), माणिक साळुंखे (२२) आणि भीमराव साठे (२६) यांना पराभवाला सामोरे जावे लागले. या पॅनलची धुरा माजी अध्यक्ष निंबाळकर व गव्हाणे यांनी सांभाळली होती.

निवडणुकीचा निकाल निवडणूक निर्णय अधिकारी आसिफ शेख यांनी जाहीर केला. त्यानंतर त्यांच्या हस्ते विजयी उमेदवारांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. या विजयात संस्थेचे ज्येष्ठ मार्गदर्शक ॲड. शरद फुटाणे आणि ज्येष्ठ नेते सुरेशचंद्र सूर्यवंशी यांचे मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरले.

निकालानंतर विजयी उमेदवार व समर्थकांनी श्री फत्तेसिंह चौक येथे फटाक्यांची आतषबाजी करत जल्लोष साजरा केला. काँग्रेसचे अरुण जाधव यांच्या हस्ते नूतन संचालकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी स्वामीराय पाटील, सुरेश फडतरे, सोपानराव गडाळ, अमर पाटील, शंकर पवार, विठ्ठल मोरे, राजू मोरे, विवेक चव्हाण, तानाजी कावळे, प्रा. मनोज जगताप आदी मान्यवर उपस्थित होते.

**सभासदांच्या विश्वासाला पात्र राहू - राजीव माने**

मागील तीन वर्षांत संस्थेच्या हितासाठी केलेल्या कामांवर सभासदांनी पुन्हा एकदा विश्वास दाखवला आहे. हा विश्वास सार्थ ठरवत पुढील काळातही संस्थेच्या प्रगतीसाठी प्रयत्न सुरू ठेवू, अशी भावना नूतन संचालक तथा माजी अध्यक्ष राजीव माने यांनी व्यक्त केली.


## Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय ॲडमीट करण्याची सोय निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

**बोअरवेल**

सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
9420766666

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**पाहिजेत**

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता सिक्युरिटी गार्ड त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

**वर-वधू**



जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र


सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने** मो. 9353370779
**रेखा बर्वे** मो. 7218370779

शिनगारे सिटी वासुद रोड अल्टिमेट जिमच्या समोर सांगोला
प्लॉट देणे आहे
N.A.
3100 sft- 3200 sft
-: संपर्क :-
शिनगारे.जे.एम
8275274353
डी.बी.शिंदे
9579421465

VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
Trusted & Approved for Leading Brands
VNP MOTORS Pvt. Ltd.
Exclusive showroom of Second Hand Car Sales & Service
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007
GOVT. APPROVED CNG RETROFITMENT CENTER & WORKSHOP


**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) आईची बहीण २) अंतराळ कक्षेतील वाहन ३) पाच गुणिले सहा ४) राष्ट्रवादीचे संस्थापक ५) शर्थ, नियम ६) नाकाने ओढतात ती तंबाखूची पूड ९) नगरपालिकेवर निवडून दिलेला लोकप्रतिनिधी १०) बंडखोर स्वभावाचे नेते-नारायण ** १२) दुर्ग, किल्ला १३) शिवकालीन लढाईची पध्दत-गनिमी ** १४) सणादिवशी करतात तो गोड खाद्यपदार्थ १५) भिंतीवरील सरपटणारा प्राणीजीव १७) दह्यापासून बनवितात ते पेय १८) छोटी चारचाकी प्रवासी गाडी २०) एखाद्याला वश करण्याचे उपाय-** ** ** भेद २१) हनुमानाच्या उपासनेचा वार २२) फलंदाजाने बनविलेल्या शंभर धावा २३) वस्तूंची संख्या २५) ध्यास, घेतला ** टाकू नये २६) वरल्या मनाने २८) भारतीय क्रिकेट टीमचे माजी प्रशिक्षक-** शास्त्री ३०) तरचा जोडीदार ३२) हस्त, कर ३३) कागदी चलन ३४) एक म्हण-*** जीव सदाशिव ३५) देवांचा राजा ३६) गती ३७) मुरली, बासरी ३८) तीन दुणे ३९) एक कडधान्य

**आडवे शब्द :** १) युपीच्या माजी महिला मुख्यमंत्री, बसपा सुप्रिमो ४) ऐंशीच्या दशकातील एक अभिनेता -*** सिन्हा ५) मुलाचे एक नाव ७) एक (इंग्रजीत) ८) उन्हाळा (इंग्रजीत) ९) बोल्टचा साथीदार ११) प्रवासाने होणारा त्रास १३) काकाची पत्नी १४) शनिवारवाडा या शहरात आहे १५) उडिदाच्या पिठापासून लाटून बनवितात ते १६) शासकीय कर्मचाऱ्यांचा सुट्टीचा दिवस १७) धातूचा बारीक तंतू १८) गोंधळ, गोंगाट १९) मनाने मजबूत २०) हळू, मंद गतीने २३) मीठ (हिंदीत) २४) चंद्रावर पहिले पाऊल ठेवणारा अंतराळवीर-** आर्मस्ट्राँग २५) उन्हाळ्यात वादळी वाऱ्यासह पडणारा पाऊस २७) बजरंगबलीच्या हातातील आयुध २८) याच्यापासून शिरा बनवितात २९) परीट, धोबी ३१) एक थोर जैन संत ३३) गुलाम, सेवक ३४) श्रीगणेशाचे एक नाव ३६) हॉटेलमधील सेवक ३७) पाकिस्तान संक्षिप्तमध्ये असे लिहितात ३८) सागर, दर्या ४०) एक द्विदल कडधान्य ४१) स्वस्तच्या विरूध्दार्थी

## सुडोकु - 212

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2 | 7 | | 1 | | | 6 |
| | | | 6 | 9 | | | 1 | |
| | 9 | 6 | | 8 | | | 5 | 3 |
| 9 | 8 | 4 | | | | | | |
| 2 | | | | | | 6 | 4 | |
| 6 | | 3 | | | 5 | 8 | | |
| | 7 | 8 | | 1 | 4 | 9 | | |
| 4 | 2 | | 3 | 6 | 7 | | | 5 |
| 5 | | 1 | | | 9 | 3 | | 4 |

# जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर
## उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. ३

शासकिय दुधडेअरी शेजारी सात रस्ता सोलापूर

दुरध्वनी क्र.०२१७-२३२०१९० Email ID- slao3@solapur.gmail.com

क्र.उभुसं/३/कावि-२/आरआर-५३ **खरेदीपूर्व जाहीर नोटीस** दिनांक- २५/०३/२०२६

सोलापूर जिल्हयातील तमाम लोकांना या जाहिर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्र.९ मंगळवेढा यांचेकडील मौजे भंडीशेगांव ता. पंढरपूर जि. सोलापूर येथील महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्र. संकिर्ण ०३/२०१५/प्र.क्र.३४ अ -२ दिनांक १२/०५/२०१५ क्र. संकिर्ण ०३ /२०१५/ प्र.क्र.३४ अ -२ दिनांक ३०/०९/२०१५ व परिपत्रक क्र. एलक्यूएन ०१/२०१७ प्र.क्र.१२ अ-२ दिनांक २५/०१/२०१७ मध्ये जमीन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी घेणेबाबत विषद केलेल्या कार्यपध्दतीनुसार सार्वजनिक प्रयोजनासाठी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी घेणे प्रस्तावित आहे.

सदर बाबत जमीनीतील हक्क, हितसंबंध इत्यादीबाबत हरकत असल्यास वा जमीनीच्या खरेदीदाराच्या अनुषंगाने म्हणणे मांडावयाचे असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासुन पंधरा दिवसाचे आत सक्षम अथवा रजिष्टर्ड पोस्टाने कार्यालयीन वेळेत (सकाळी १०.३० ते सायं ५.४५ वाजेपर्यंत) पोहचेल अशा रितीने उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र.३ सोलापूर या कार्यालयाकडे लेखी म्हणणे / हरकत सादर करावी. अन्यथा खालील अनुसूचीत स्तंभ ३ मध्ये नमुद जमीन स्तंभ २ मध्ये नमुद जमीन मालकाची निर्वेध व निजोखमी मिळकत असल्याचे समजण्यात येईल दिलेल्या मुदतीनंतर कोणतीही हरकत असल्यास ती या कार्यालयास कायदेशिररित्या बंधनकारक राहणार नाही.

**अनुसूची**

**कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्र. ९ मंगळवेढा**

**गाव भंडीशेगाव ता. पंढरपूर**

| अ.क्र. | भूधारकांचे नांव- | गट नंबर/ सर्व्हे नंबर | गाव न.नं.७/१२प्रमाणे एकूण क्षेत्र (हे आर) | भूधारणा पध्दती | खरेदी करावयाचे क्षेत्र (हे आर) |
|---|---|---|---|---|---|
| | १.उउका/वित.क्रं.२४ ची लवि क्र. १एसआर क्र.८०/१९९७ (मो नं.११६/९७ नविन एस आर ११/२०२६ | | | | |
| १ | सरस्वती विजय काळे, शैला संजय निंबाळकर, अनिल विजय काळे, अनिता ज्ञानेश्वर शेळके | ६३५/१ | १.८९ | जिरायत | ०.०९ |
| | धनशाम सुखदेव नागणे | ६३५/२/अ/१/क | ०.२७ | जिरायत | |
| | बाळू सुखदेव नागणे | ६३५/२/ब/१/क | ०.२७ | जिरायत | |
| | कृष्णा सुखदेव नागणे | ६३५/२/ब/२/क | ०.३ | जिरायत | |
| | कृष्णा सुकदेव नागणे, शंकर सुकदेव नागणे, बापु सुकदेव नागणे, गोरख गंगाराम नागणे, मोहन गंगाराम नागणे, भामाबाई विठठल नागणे, सतिश विठठल नागणे, विजय विठठल नागणे, व्दारका तूकाराम नागणे, सुरेश ज्ञानेश्वर नागणे | ६३५/२/ब/३ | ०.१० | जिरायत | |
| | गोरख गंगाराम नागणे, मोहन गंगाराम नागणे | ६३५/२/ब/४/अ | ०.८१ | जिरायत | |
| | गणेश वसंत नागणे | ६३५/२/ब/४/ब | ०.३४ | जिरायत | |
| | मारूती महादेव यममार | ६३५/२/ब/४/क | ०.३४ | जिरायत | |
| | सुरेश ज्ञानेश्वर नागणे | ६३५/२/ब/४/ड | ०.६८ | जिरायत | |
| | गोरख गंगाराम नागणे | ६३५/२ब/१ब/ २ब/१ब/२ब/२ब | १.१ | जिरायत | |
| | मोहन गंगाराम नागणे | ६३५/ब१/अ/ब२/ १अ/ब२/२अ | १.३१ | जिरायत | |
| २ | गणेश वसंत नागणे | ६३६/१ | १.२१ | जिरायत | ०.०६ |
| | वसंत येदू नागणे | ६३६/२ | ०.४ | जिरायत | |
| | गणेश वसंत नागणे | ६३६/३ | १.७१ | जिरायत | |
| ३ | विठठल संतराम नागणे, सुवर्णा श्रीमंत नागणे,अनिल विठठल नागणे | ६३७/१ | १.८८ | जिरायत | ०.०४ |
| ४ | तूकाराम निव्वृत्ती सोळगे | ६३७/२/अ | ०.४७ | जिरायत | ०.०४ |
| | शिवाजी शंकर जगदाळे | ६३७/२/ब | ०.४६ | जिरायत | |
| | यशंवत केशव सुरवसे | ६३७/२/क | ०.४६ | जिरायत | |
| | सुनिल बळीराम नागणे, वंदना सुनिल नागणे | ६३७/२/ड | ०.४९ | जिरायत | |
| ५ | दत्तात्रय लक्ष्मण गायकवाड,मनिषा दत्तात्रय गायकवाड | ६३८/१ | १.१४ | जिरायत | ०.०३ |
| | विश्वनाथ लक्ष्मण गायकवाड | ६३८/२ | ०.३४ | जिरायत | |
| ६ | दत्तात्रय लक्ष्मण गायकवाड | ६३९/१ | १.१६ | जिरायत | ०.०४ |
| | विश्वनाथ लक्ष्मण गायकवाड | ६३९/२ | ०.३३ | जिरायत | |
| ७ | बाळासो लक्ष्मण मोहिते | ६४२ | १.५८ | जिरायत | ०.०४ |
| ८ | सुरेश रामचंद्र मोहिते | ६४३ | १.५६ | जिरायत | ०.०४ |
| ९ | बळीराम आप्पा मोहिते | ६४४ | १.६३ | जिरायत | ०.०६ |
| १० | शंकर बळीराम मोहिते | ६४९/१/अ | ०.२ | जिरायत | ०.०५ |
| | बाबासो आप्पा मोहिते | ६४९/१/ब | १.०६ | जिरायत | |
| ११ | श्रीमंत बाजीराव जाधव | ६५०/१ | १.२८ | जिरायत | ०.५ |
| १२ | श्रीमंत बाजीराव जाधव | ६५१/१ | १.४१ | जिरायत | ०.५ |
| १३ | शंकर बळीराम मोहिते | ६५२/१ | ०.४४ | जिरायत | ०.४ |
| | बाबासो दगडू जाधव | ६५२/२ | ०.४५ | जिरायत | |
| | बबन बाबूराव जाधव | ६५२/३ | ०.४२ | जिरायत | |
| | अरुण रामचंद्र गव्हाणे | ६५२/४ | ०.२५ | जिरायत | |
| | हिराबाई रामचंद्र गव्हाणे, अविनाश रामचंद्र गव्हाणे, अरूण रामचंद्र गव्हाणे, आशाबाई आनंद यादव | ६५२/५ | ०.२५ | जिरायत | |
| | नवनाथ लक्ष्मण गव्हाणे | ६५२/६ | ०.५ | जिरायत | |
| १४ | नवनाथ लक्ष्मण गव्हाणे, बाबासो दगडू जाधव, गोरख रामा जाधव,मंगल रामा जाधव | ६५३ | १.६५ | जिरायत | ०.०४ |
| १५ | मधूकर ज्ञानेश्वर खवणकर | ६५४/१ | ०.४ | जिरायत | ०.०८ |
| | बबन बाबूराव जाधव, सजाबाई लक्ष्मण गव्हाणे, नवनाथ लक्ष्मण गव्हाणे | ६५४/२ | १.२५ | जिरायत | |
| १६ | मधूकर ज्ञानेश्वर खवणकर | ६५५/१ | ०.४१ | जिरायत | ०.०६ |
| | बबन बाबूराव जाधव, नवनाथ लक्ष्मण गव्हाणे, विशाल बाळासाहेब गव्हाणे | ६५५/२ | १.७३ | जिरायत | |
| | २) वितरीका क्र.२४ ची ल. वि.क्र.२ एस आर क्र. ८१/१९९७ (मोर नं.-११७) नविन एस आर ११/२०२६ | | | | |
| १ | दादा नारायण यलमार | ६५६/१ | १.३६ | जिरायत | ०.१३ |
| २ | रामचंद्र एकनाथ कोळवले, माणिक दामोदर गुरव, साहेबराव वामन वाघमारे, संपलाबाई दिलीप भोसले, केराबाई वामण वाघमारे, दाजी दिलीप भोसले, नितिन दिलीप भोसले, मुक्ताबाई मारूती वाघमारे, महादेव मारूति वाघमारे, गंगूबाई ज्ञानोबा चंदनशिवे, संगूबाई दिना ओव्हाळ, सुलभ सुनिल चव्हाण, तुषार दतात्रय काशिद | ६५६/२ | २.७३ | जिरायत | |
| ३ | संभाजी हरि यलमार,अनुराधा पांडूरंग यलमार,अशोक सुखदेव माईतकर, शिवाजी ज्ञानोबा यलमार,रंजना जगन्नाथ तुभार | ६५७ | १.९७ | जिरायत | ०.०६ |
| ४ | शोकात लतिफ शेख, संजय निवृत्ती जाधव | ६६३ | ०.२५ | जिरायत | ०.०७ |
| ५ | अक्षय मोहन गिडे, निकिता मोहन गिडे अपाक साळूबाई, साळूबाई मोहन गिडे | ६६४ | २.१८ | जिरायत | ०.०४ |
| ६ | भारत शिवाजी जाधव | ६६६/१ | ०.५ | जिरायत | ०.०४ |
| | चंद्रभागा शिवाजी जाधव | ६६६/२ | ०.५१ | जिरायत | |
| | ललिता दतात्र काशिद | ६६६/३ | ०.५१ | जिरायत | |
| ७ | दलिंग तानाजी खर्चे, तन्मय दत्तात्रय काशिद | ६६७ | २.७९ | जिरायत | ०.०७ |
| | (३) थेट विमोचक क्र.३२ एस.आर क्र. ७३/१९९७ (मो नं १०९) नविन एस आर ११/२०२६ | | | | |
| १ | सागर पोपट चव्हाण | ५५४/१/अ/१ | ०.४ | जिरायत | ०.०३ |
| | अनिल मारुती चव्हाण | ५५४/१/अ/२ | ०.४ | जिरायत | |
| | रामचंद्र धोंडी चव्हाण, धिरज धनाजी शिंदे, अपाक रेखा ऋतूजा धनाजी शिंदे अपाक रेखा, रेखा धनाजी शिंदे | ५५४/१/अ/३ | ०.६ | जिरायत | |
| | मारूती धोंडी चव्हाण, विश्वंभर धोंडी चव्हाण, रामचंद्र धोंडी चव्हाण | ५५४/१/अ/४ | ०.२१ | जिरायत | |
| | शिवाजी बाळू घाडगे, पोपाट बाळू घाडगे, पांडूरंग वाळू घाडगे, रामदास शिवाजी घाडगे | ५५४/१/ब | १.२५ | जिरायत | |
| | अभिजित बाजीराव माने | ५५४/२/अ | ०.८३ | जिरायत | |
| | विश्वजित बाजीराव माने | ५५४/२/ब/१ | ०.४१ | जिरायत | |
| | अभिजित बाजीराव माने | ५५४/२/ब/२ | ०.४१ | जिरायत | |
| २ | रामचंद्र सिताराम लोखंडे | ९७०/१ | १.३ | बागायत | ०.०७ |
| | रूक्मिणी रमेश यलमार | ९७०/२/अ | १ | बागायत | |
| | हणमंत विठोबा चौगुले,उत्तम हणमंत नागणे चौगुले, अरूण हणमंत नागणे चौगुले भारत हणमंत नागणे चौगुले | ९७०/२/ब/१ | ३.८५ | जिरायत | |
| | तूकाराम विश्वंभर चव्हाण, पोपट विश्वंभर चव्हाण | ९७०/२/ब/२ | १.२१ | बागायत | |
| | सुरज अनिल चव्हाण अपाक अनिल मारुती चव्हाण | ९७०/२/ब/३ | ०.४१ | बागायत | |
| | निवृत्ती काशिनाथ नागणे, रमेश कृष्णा यलमार | ९७०/२/ब/४ | १.९४ | बागायत | |
| | संतोष बजरंग यलमार, अमोल रमेश यलमार, प्रदिप रमेश यलमार | ९७०/२/क/१ | २.४३ | बागायत | |
| | इंदूबाई सुरेश गिडडे, दत्तात्रय अशोक भांगे | ९७०/२/क/२ | ०.८ | खाजगी वाटाघाटी ने | |
| | (४) उउका/वित. कक्र.२४ अ मायनर क्र.५ २३/२००७ (मोर नं.२३९) नविन एस आर ११/२०२६ | | | | |
| १ | अर्चना अनिल सुरवसे, मुकूंद बाळाजी डिंगरे | २९० | १.२१ | जिरायत | ०.२१ |
| | (५) उउका/वित. कक्र.२४ अ मायनर क्र. ६ २१/२००७ (मोर नं.२३९) नविन एस आर ११/२०२६ | | | | |
| १ | योगेश वसंत नागणे,अपाक सिंधू नागणे, विलास वसंत नागणे | २८५ | २.५८ | जिरायत | ०.०६ |
| २ | सत्यवान लक्ष्मण नागणे | २८६ | ३.१६ | जिरायत | ०.०६ |
| ३ | समाधान त्रिंबक सुरवसे, बाळू जोतीराम सुरवसे | २९३/३ | ०.८१ | बागायत | ०.०३ |
| | (६) वितरीका क्र.२३ ची ल.वि.क्र ३ एस.आर.क्र.८६/१९९४ (मोर.नं.४०५ नविन एस आर ११/२०२६ | | | | |
| १ | गणेश वसंत साळुंखे, बाळासाहेब तूकाराम साळुंखे, उज्जला जयसिंह कवडे, रोहन जयसिंह कवडे, अपाक उज्जला निखल जयसिंह कवडे, अपाक उज्जला | ५२८/१ | १.६२ | जिरायत | ०.५२ |
| | हरिदास तूकाराम साळुंखे, गणेश वसंत साळुंखे, नरसिंह दत्तू कवडे, उज्जला जयसिंह कवडे, रोहन जयसिंह कवडे, अपाक उज्जला, निखल जयसिंग कवडे, अपाक उज्जला | ५२८/२ | १.६२ | जिरायत | |
| | गणेश वसंत साळुंखे, बाळासाहेब तूकाराम साळुंखे, नरसिंग दत्तू कवडे | ५२८/३ | १.६१ | जिरायत | |
| | राजकूमार दिनकरराव कवडे, सिध्देश्वर लक्ष्मण साळुंखे, संतोष बलभिम साळुंखे सुनीता विजयकुमार देशमुख | ५२८/४ | १.६२ | जिरायत | |
| | सिध्देश्वर लक्ष्मण साळुंखे, हिराबाई दिनकरराव कवडे विष्णू बलभिम साळुंखे समर्थ राजकुमार कवडे अपाक राजकूमार दिनकर कवडे | ५२८/५ | १.६२ | जिरायत | |
| | सिध्देश्वर लक्ष्मण साळूंखे, विष्णू बलभिम साळुंखे, सुनिता विजयकुमार देशमुख | ५२८/६ | १.६१ | जिरायत | |
| | नरसिंह दत्तू कवडे | ५२८/७ | १.६२ | जिरायत | |
| | नरसिंह दत्तू कवडे, उज्जला जयसिंह कवडे, रोहन जयसिंह कवडे अपाक आई उज्ज्वला निखल जयसिंह कवडे अपाक आई उज्ज्वला | ५२८/८ | १.६१ | जिरायत | |
| | उज्ज्वला जयसिंह कवडे, रोहन जयसिंह कवडे, अपाक आई उज्ज्वला निखल जससिंह कवडे अपाक आई उज्ज्वला | ५२८/९ | १.६३ | जिरायत | |
| | राजकूमार दिनकरराव कवडे | ५२८/१० | १.६२ | जिरायत | |
| | समर्थ राजकूमार कवडे, अपाक राजकूमार दिनकर कवडे | ५२८/११ | १.६१ | जिरायत | |
| | सरपंच ग्रामपंचायत भंडीशेगाव, राजकूमार दिनकर कवडे | ५२८/१२ | १.६२ | जिरायत | |
| २ | भास्कर प्रभाकर कवडे | ५४३/१ | ३.८५ | जिरायत | ०.३८ |
| | सुलोचना प्रभाकर कवडे | ५४३/२ | ३.८६ | जिरायत | |
| | राजेश प्रभाकर कवडे | ५४३/३ | ३.८५ | जिरायत | |
| ३ | विलास गोविंद कवडे | ५४२/१/अ | ३.२३ | जिरायत | ०.२२ |
| | लक्ष्मण विठोबा साळुंखे | ५४२/१/ब | १ | जिरायत | |
| | विलास रंगनाथ साळूंखे, सुभाष रंगनाथ साळुंखे | ५४२/२/अ | ३.२२ | जिरायत | |
| | तूकाराम विठोबा साळुंखे,लक्ष्मण विठोबा साळुंखे, रंगनाथ विठोबा साळुंखे, वसंत विठोबा साळूंखे, प्रकाश वसंतराव साळुंखे | ५४२/२/ब | १ | जिरायत | |
| ४ | पोपाट नारायण कवडे, शिवा बाबू शिंदे, नारायण तूकाराम कवडे | ५३५ | ०.०४ | जिरायत | ०.०६ |
| ५ | अभिजित रामचंद्र शिंदे, सपना रामचंद्र शिंदे, अंजना रामचंद्र शिंदे, अश्वीनी रामचंद्र शिंदे | ५३८/१/अ | १.०८ | जिरायत | ०.०३ |
| | बाबासाहेब सुकदेव शिंदे | ५३८/१/ब | १.०७ | जिरायत | |
| | भारत श्रीरंग सरडे | ५३८/१ | ०.८१ | जिरायत | |
| ६ | लक्ष्मण विठोबा साळुंखे, श्रीरंग कृष्णा सुरवसे, वसंत विठोबा साळुंखे | ५३९/१ | १.०७ | जिरायत | ०.०४ |
| | सिध्देश्वर लक्ष्मण साळुंखे | ५३९/२/अ | ०.२७ | जिरायत | |
| | अनिल मारूती चव्हाण | ५३९/२/ब | ०.२७ | जिरायत | |
| | पोपट विश्वंभर चव्हाण, तूकाराम विश्वंभर चव्हाण | ५३९/२/क | ०.२७ | जिरायत | |

**सही/-**
**(संतोषकुमार देशमूख)**
**उपजिल्हाधिकारी,**
**भूसंपादन क्रं. ३, सोलापूर**

जिमाका/सो/जाहि/४२४/२०२५-२६

# भाऊसाहेब मोरे स्मृती व्याख्यानमालेत विविध विषयांवर मार्गदर्शन



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** भाऊसाहेब मोरे यांच्या ७८ व्या जयंतीनिमित्त ज्ञानेश्वर मोरे बिगरशेती ग्रामीण पतपुरवठा संस्था, वडवळ यांच्या वतीने लोकरत्न भाऊसाहेब मोरे स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार दि. १ एप्रिल ते शुक्रवार दि. ३ एप्रिल २०२६ या कालावधीत जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा, वडवळ येथील मैदानावर ही तीन दिवसीय व्याख्यानमाला होणार आहे.

बुधवार दि. १ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता पोपटबुवा शिवपुजे खर्गे महाराज व आकाशबुवा शिवपुजे खर्गे महाराज यांच्या हस्ते व्याख्यानमालेचे उद्घाटन होणार आहे. यावेळी नूतन जिल्हा परिषद सदस्य सचिन जाधव, विमलताई खताळ, बालाजी नरुटे व लखन शिंदे यांचा सत्कार करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष राजन पाटील असतील, तर माजी आमदार यशवंत माने प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. यानंतर सायं. ७.३० वाजता राहुल गिरी (गेवराई) यांचे 'संस्काराची शिदोरी - वर्तमान पिढीची जबाबदारी' या विषयावर व्याख्यान होईल.

गुरुवार दि. २ एप्रिल रोजी सायं. ७ वाजता लोकरत्न भाऊसाहेब मोरे जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यावेळी पंचायत समितीचे नूतन सभापती अस्लम चौधरी, उपसभापती उल्का पाटील तसेच सदस्यांचा सत्कार होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष बाळराजे पाटील असतील, तर भाजपा जिल्हाध्यक्ष शशिकांत नाना चव्हाण प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील. सायं. ७.३० वाजता प्रबोधनकार गणेश शिंदे (अहिल्यानगर) यांचे 'हे जीवन सुंदर आहे' या विषयावर व्याख्यान होणार आहे.

शुक्रवार दि. ३ एप्रिल रोजी सायं. ७ वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात येईल. यावेळी कृषी उपसंचालक पदावर निवड झाल्याबद्दल मयुरी सजेर्राव गायकवाड यांचा सत्कार होणार आहे. सायं. ७.३० वाजता शिवव्याख्याते ज्ञानदेव काशिद (बीड) यांचे 'असा राजा होणे नाही' या विषयावर व्याख्यान होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपनिबंधक सहकारी संस्था मोहोळ सुमित कवडे असतील, तर सहाय्यक निबंधक एस. टी. तेलंगरे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील.

राजकारण, समाजकारण आणि सहकार क्षेत्रात ठसा उमटवणारे भाऊसाहेब मोरे यांच्या कार्यातून युवकांना प्रेरणा मिळावी व समाजात प्रबोधनात्मक विचार रुजावेत, या उद्देशाने व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. या व्याख्यानमालेस नागरिकांनी सहकुटुंब उपस्थित राहावे, असे आवाहन पतसंस्थेचे चेअरमन राहुल मोरे यांनी केले आहे.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी बापूसाहेब दळवे, सूर्यकांत मोरे, शाहू धनवे, सुशांत मोरे, निलेश व्यवहारे, संतोष पवार, दीपक काकडे, अमोल शिंदे, लक्ष्मण मळगे, बापू शिंदे तसेच भाऊसाहेब मोरे प्रतिष्ठानचे कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

# अवकाळी पावसाने मोहोळ हादरला; शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान





**मोहोळ (कटूसत्य वृत्त) :** मोहोळ तालुक्याच्या पश्चिम भागाला बुधवारी (दि. २५) मध्यरात्री विजांच्या कडकडाटात वादळी वाऱ्यासह आलेल्या अवकाळी पावसाने तडाखा दिला. सुमारे तासभर सुरू असलेल्या या पावसासोबत अर्धा तास झालेल्या गारपिटीमुळे शेती पिके व फळबागांचे प्रचंड नुकसान झाले आहे.

तालुक्यातील देवडी, खंडाळी, पापरी, वाफळे, शेटफळ या भागात तुफान पाऊस व गारपीट झाली. वादळी वाऱ्यामुळे ज्वारी, गहू, हरभरा यांसारखी रब्बी पिके आडवी झाली, तर द्राक्ष, केळी, आंबा यांसारख्या फळबागांचेही मोठे नुकसान झाले. गारपिटीमुळे अनेक झाडांची पाने गळून पडली असून काही झाडे उन्मळून पडली आहेत.

देवडी येथे नवीन घराचे बांधकाम सुरू असताना सुमारे सात फूट उंचीपर्यंत उभारलेल्या भिंती जोरदार वाऱ्यामुळे कोसळल्या. तसेच अनेक घरांवरील पत्रे व शेड उडून गेल्याने नागरिकांचे नुकसान झाले आहे. युवराज भोसले यांच्या शेतात विजेचा खांब कोसळून जर्शी गाय गंभीर जखमी झाल्याची घटना घडली.

सध्या काढणीला आलेली ज्वारी, गहू व हरभरा ही पिके शेतात कापून ठेवलेली असतानाच अचानक पावसाने हजेरी लावल्याने ती पूर्णपणे भिजली. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. द्राक्षबागा काढणीच्या अवस्थेत असतानाच गारपिटीमुळे नेस्तनाबूत झाल्याने उत्पादकांना मोठा फटका बसला आहे.

अचानक आलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांना पिकांचे संरक्षण करण्याची कोणतीही संधी मिळाली नाही. काही मिनिटांतच होत्याचे नव्हते झाले असून लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, या नुकसानीचे पंचनामे प्रशासनाने तात्काळ सुरू करून नुकसानग्रस्त शेतकरी व बाधित नागरिकांना शासनाकडून त्वरित मदत व भरपाई देण्यात यावी, अशी मागणी शेतकरी व ग्रामस्थांमधून होत आहे.